
आयडॉल ऑफ महाराष्ट्र



# अमोल रावेतकर

रीडेव्हलपमेंट क्षेत्रातील विश्वासाचं दुसरं नाव

तारुण्यात दुःखाचे चटके सहन करत, आलेल्या अनेक समस्यांना नीडरपणे सामोरे जात पुण्यात बांधकाम रीडेव्हलपमेंट क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणारं व्यक्तिमत्त्वं म्हणजे अमोल रावेतकर. रावेतकर ग्रुप नावाने प्रचलित असणाऱ्या या बांधकाम क्षेत्रातील अग्रगण्य ग्रुपने पुणेकरांचा विश्वास सार्थ ठरवत पुण्यात रेसिडेन्शियल, कमर्शिअल व इंडस्ट्रियल प्रोजेक्ट पूर्ण केलेले आहेत. कला व शिक्षण क्षेत्रात आपली सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक क्षेत्रातही आपलं वेगळं वलय निर्माण केलं आहे.

**रावेतकर ग्रुपने वेगवेगळ्या रिअल इस्टेट विभागांमध्ये महत्त्वाचे टप्पे विकसित केले आहेत. यामध्ये पुणे व आसपासच्या निवासी, व्यावसायिक तसेच औद्योगिक विभागातील काही संस्मरणीय रचनांचा समावेश आहे. रावेतकर ग्रुपने आजपर्यंत सुवर्णा, अंजलिकुंज, मनाली, पियुषा, अनुषा, ओम ब्रह्मा, ट्यूलिप्स, राहुल विहार, पौर्णिमा, अंगराज रिसॉर्ट आणि अंगराज वॉटर पार्क हे प्रोजेक्ट्स पूर्ण केलेले आहेत. जान्हवी, सुखनिवास, ७० वेस्ट ॲव्हेन्यू, अनुश्री, अरिहंतश्री, श्रीओम या त्यांच्या प्रोजेक्ट्सचं काम सध्या सुरू आहे. अरिषा, धनगौरी, महालक्ष्मी हे त्यांचे भविष्यातील प्रोजेक्टस आहेत.**

बांधकाम क्षेत्र हे जरी अनेक बांधकाम व्यावसायिकांसाठी यशाच्या संधी उपलब्ध करून देणारं क्षेत्र असलं तरी या क्षेत्राबाबत समाजात अनेक समज-गैरसमज आहेत. त्याला कारणंही तशीच आहेत. अनेक बिल्डर लोकांनी लोकांची फसवणूक केली आहे. घर हे अन्न, वस्त्र, निवारा या बेसिक गरजांमध्ये येतं. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी हा अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. आयुष्यात स्वतःचं एक तरी घर असावं असं प्रत्येकाला वाटतं. याचाच फायदा घेऊन या क्षेत्रात अनेक लोकांना फसवण्याचे प्रसंगही पुढे येतात.  असं असलं तरी या क्षेत्रातही प्रामाणिक असणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे. या व्यवसायात नफा कमावण्यापेक्षा लोकांना निवाऱ्याची सोय कशी होईल, ही सोय देताना त्यांच्या भौतिक सुख-सुविधा त्यांना जास्तीत-जास्त कशा देता येतील यासाठी ते प्रयत्नशील असतात. यासाठी वैयक्तिक फायद्याचा विचार न करता ते मध्यमवर्गीयांना चांगलं घर देऊन त्यांच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाचं स्वप्न पूर्ण करतात. अशा समाजाभिमुख बांधकाम क्षेत्रातील सर्वांत वरच्या दर्जाचं काम करणारा ग्रुप म्हणजे पुण्यातील रावेतकर ग्रुप. या ग्रुपचे सर्वेसर्वा अमोल रावेतकर त्यांच्या या वाटचालीबाबत...

अमोल रावेतकर यांचा जन्म १५ मे १९७६ रोजी पुण्यातील रावेतकर कुटुंबात झाला. रावेतकर कुटुंब हे उच्चशिक्षित कुटुंब. त्यांच्या कुटुंबात अनेक लोक ही वेगवेगळ्या क्षेत्रांत उच्च पदावर कामाला होते. अमोल यांचे आजोबा बँक ऑफ इंडियामध्ये उच्च पदावर, मोठे काका फिलिप्स कंपनीत, दोन नंबरचे काका भाभा रिसर्च सेंटरमध्ये नोकरीला होते. त्या काळात अशा नामांकित कंपन्या व संस्थांमध्ये काम करणारे मोजकेच लोक समाजात असायचे. त्या काळात रावेतकर कुटुंब हे उच्चशिक्षण घेऊन चांगली नोकरी मिळवायची व आयुष्यात सेटल व्हायचं हा विचार करायचे. एकूणच संपूर्ण रावेतकर कुटुंबीयांची मानसिकता ही उच्च शिक्षण घेऊन नोकरी करण्याची होती. त्या वेळी कोणी या मानसिकतेला छेद देण्याचं धाडस करत नव्हतं. पण हे धाडस अमोल यांचे वडील अजित रावेतकर यांनी केलं व आपला वेगळा मार्ग निवडला. त्यांनी आर्किटेक्चरचं शिक्षण पूर्ण करून काही काळ मुंबईमध्ये नोकरी केली. मुंबईहून परत येऊन त्यांनी स्वतःची आर्किटेक्चरची फर्म सुरू करून व्यवसाय सुरू केला.

त्या काळात मराठी माणसाने व्यवसाय करण्याचा निर्णय घेणं ही नक्कीच सोपी गोष्ट नव्हती. स्वतःच्या हिमतीच्या जोरावर त्यांनी कुठलंही आर्थिक पाठबळ नसताना हा निर्णय घेतला. त्यांच्या आर्किटेक्चर फर्मच्या माध्यमातून लोकांना बिल्डिंगचं डिझाईन बनवून देण्याचं काम सुरू केलं. त्यांनी बनवून





दिलेली डिझाईन्स लोकांना आवडू लागली. लोकांच्या मनात त्यांच्याविषयी विश्वास निर्माण होऊ लागला. लोकांना त्यांची कामाची पद्धत आवडू लागली. त्यामुळे बिल्डिंगचं डिझाईन बनवून दिल्यानंतर बांधकामदेखील तुम्हीच का करत नाही, अशी विचारणा लोक त्यांच्याकडे करू लागले. लोकांनी त्यांच्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे काम करण्याचा नवीन उत्साह त्यांच्यात संचारला. मिळालेल्या संधीचं सोनं करत अजित यांनी बांधकाम क्षेत्रातील व्यवसायाला सुरुवात केली. लोकांच्या गरजेनुसार ते वेगवेगळ्या वास्तूंचं डिझाईन बनवून देत असत. त्याचबरोबर त्यांच्या मागणीनुसार बांधकामाचंही काम ते करू लागले. हळूहळू बांधकाम क्षेत्रात त्यांचा कल वाढू लागला.

१९८४ मध्ये अजित यांनी बांधकाम क्षेत्रातील स्वतःची कंपनी स्थापन करून, त्या कंपनीच्या माध्यमातून बांधकाम व्यवसायाला सुरुवात केली. खूप कमी कालावधीत स्वतःच्या कौशल्याच्या जोरावर व ग्राहकांना दिलेल्या उत्तम सेवेमुळे त्यांची गणना पुण्यातील काही नामांकित बिल्डरपैकी एक अशी होऊ लागली. त्यांच्या व्यवसायाचा आलेख दिवसेंदिवस उंचावत होता. हा काळ त्यांच्यासाठी सुवर्णकाळ होता. अमोल यांनादेखील या काळात खूप चांगले दिवस अनुभवायला मिळाले. त्या काळात शाळेत जाण्यासाठी त्यांना स्वतःची कार व ड्रायव्हर होता. शालेय जीवनातील हा काळ त्यांच्यासाठी अतिशय सुखद असा होता. महाराष्ट्र मंडळाच्या कटारिया हायस्कूलमध्ये अमोल यांचं दहावीपर्यंतचं शिक्षण पूर्ण झालं. शिक्षणात अमोल हे हुशार होते. अभ्यासाबरोबरच अमोल खेळ, थिएटरमध्ये जास्त ॲक्टिव्ह होते. हॉकी, क्रिकेट, फुटबॉल या खेळांमध्ये शाळेकडून अनेक स्पर्धांमध्ये खेळून त्यांनी चांगली कामगिरी केली होती. कला क्षेत्राची आवड असल्याने थिएटरमध्येदेखील त्यांनी खूप मोठ्या प्रमाणात काम केलं होतं.

**कोरोना महामारीच्या काळात अमोल यांनी आपलं सामाजिक दायित्व निभावलं आहे. या कठीण काळातही कोरोना योद्धा म्हणून आरोग्य सेवा पुरवताना ज्या–ज्या सुविधा अपुऱ्या पडतात त्यामध्ये मदत करण्याचा त्यांनी आपला पायंडा कायम ठेवला आहे. कोरोनाच्या या कठीण काळात सुरुवातीला त्यांनी स्वॅब कलेक्शन बुथ डिझाईन करून ते महानगरपालिकेला हस्तांतरित केले. त्याचबरोबर हॅन्ड सॅनिटायझर, मास्क यांचाही पुरवठा गरजेनुसार गरीब व गरजू लोकांना केला.**

अमोल यांनी अकरावी–बारावीचं त्यांचं शिक्षण फर्ग्युसन कॉलेजमधून पूर्ण केलं. वडिलांचा व्यवसाय काही कारणांमुळे अडचणीत आल्याने कॉलेजला येईपर्यंत घरची आर्थिक परिस्थिती त्यांची बरीचशी खालावली होती. लहानपणापासून अमोल वडिलांच्या साईटवर सुट्टीच्या दिवशी जात, त्यामुळे त्यांना बांधकाम क्षेत्राचं आकर्षण वाटत होतं. व्यवसायात पाहिलेले चढ–उतार आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नयेत, असं अमोल यांच्या वडिलांना वाटलं; त्यामुळे बारावीनंतर त्यांनी अमोल यांना सिव्हील इंजिनीअरिंग ऐवजी कॉम्प्युटर इंजिनीअरिंग करण्याचा सल्ला दिला. त्या काळात कॉम्प्युटर इंजिनीअरिंग क्षेत्रात भरपूर वाव होता. वडिलांच्या सांगण्यावरून अमोल यांनी कॉम्प्युटर इंजिनीअरिंग पूर्ण केलं. इंजिनीअरिंगचं शिक्षण पूर्ण करत असताना अमोल यांना सत्येन पटेल, अमित बिवलकर, निलेश सुळे, राकेश बापट, प्रसाद निमगावकर यांच्यासारखे जिवाभावाचे मित्र मिळाले. मित्र चांगले असतील तर आपल्या आयुष्याला चांगली दिशा मिळते असं अमोल सांगतात. त्यांचे हे सर्वच मित्र ध्येयवादी असल्याने अमोल यांनाही आपल्या आयुष्याची दिशा ठरवतांना योग्य ते मार्गदर्शन मिळत गेलं.

इंजिनिअरिंगचं शिक्षण चालू असताना त्यांचे वडील अजित यांना १९९९ सालापासून अनेक आजारपणांना सामोरं जावं लागलं. यामुळे त्यांच्या अनेक साईट्स अर्धवट राहून अडचणीत आल्या होत्या. या अपूर्ण साईट्स पूर्ण करण्यासाठी अमोल यांनी इंजिनीअरिंगच्या तिसऱ्या वर्षाला असतानाच कामात लक्ष द्यायला सुरुवात केली. मनात नसूनही नियतीच्या इच्छेप्रमाणे ते नकळत बांधकाम व्यवसायात ओढले गेले. अपूर्ण राहिलेल्या साईट्स पूर्ण करणं तसं सोपं काम नव्हतं. इच्छा कितीही असली तरी आर्थिक पाठबळ असणंही तितकंच महत्त्वाचं असतं. त्यामुळे काम पूर्ण करण्यासाठी अमोल यांना पैसा उभा करण्यासाठी खूप तारेवरची कसरत करावी लागली. अनेक प्रयत्नांनंतर २००० ते २००५ सालापर्यंत ते अडकलेल्या साईट्स सुरू करण्यात काही प्रमाणात यशस्वीदेखील झाले.

दरम्यानच्या काळात २००२ मध्ये अमोल यांचं लग्न त्यांची कॉलेज मैत्रीण अदिती गोडबोले यांच्याशी झालं. अदिती यांची फॅमिलीही उच्च शिक्षित होती. त्यांच्या आजोबांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यांचे वडील उदय गोडबोले हे नामांकित कंपनीत उच्च पदावर सर्व्हिस करत होते. अदिती या एम.बी.ए. असून त्या सध्या कमिन्स कंपनीत एच.आर. डिपार्टमेंट हेड म्हणून कार्यरत आहेत. अमोल यांच्या अडचणीच्या काळात अदिती यांनी त्यांना समर्थपणे साथ दिली. अमोल सांगतात, ''अदितीने मला माझ्या कठीण काळात खूप भक्कम साथ दिली. तिने मला सांगितलं की, घरची सर्व



जबाबदारी सांभाळायला मी आहे. तू तुझं स्वप्न पूर्ण कर. तिच्या या भक्कम आधारामुळेच मी आत्मविश्वासाने व्यवसायात झेप घेऊ शकलो.''

२००८ मध्ये अमोल यांनी त्यांच्या व्यवसायाची पायाभरणी केली. अपघाताने बांधकाम क्षेत्रात अमोल यांचा प्रवेश झाला असला तरी त्यांनी नवीन साईट्स डेव्हलप करण्याऐवजी रीडेव्हलपिंगला प्राधान्य दिलं. रीडेव्हलपिंगला पसंती देण्यामागचं कारण म्हणजे या कामात जास्त पैसा गुंतवावा लागत नाही. त्यामानाने रिस्कही कमी असते. याउलट नवीन साईट डेव्हलप करून ती विकणे यात सुरुवातील खूप मोठ्या प्रमाणात पैसा गुंतवावा लागतो, तसेच त्यात रिस्कही अधिक असते. त्यामुळे सावध पवित्रा घेत अमोल यांनी सुरुवातीला रीडेव्हलपिंग क्षेत्रावरच जास्त भर दिला.


अमोल यांचं पहिलं रीडेव्हलपिंगचं काम तर अगदीच अचानकपणे त्यांना करायला मिळालं. असंच एके दिवशी प्रभात रोडला ते फिरत असताना एका जुन्या बिल्डिंगच्या बाहेर तिथल्या मालक असलेल्या संत आजींशी अमोल यांची भेट झाली. अमोल यांनी सहजच ''तुम्ही तुमची ही जुनी झालेली बिल्डिंग रीडेव्हलप का करून घेत नाही'' असं विचारलं. त्यावर त्या आजींनी त्यांची भेट सोसायटीचे सेक्रेटरी औदारे यांच्याशी घालून दिली. त्यांच्याशी चर्चा केल्यांनतर अमोल यांनाच त्यांनी त्या बिल्डिंगचं रीडेव्हलपिंगचं काम दिलं. अमोल यांच्यावर दाखवलेला विश्वास त्यांनी सार्थ करून दाखवला. ही साईट पूर्ण करताना त्यांना अनंत अडचणी आल्या. या व्यवसायात मोठं भांडवल असणं गरजेचं असतं अशा वेळी ही साईट पूर्ण करण्यासाठी त्यांनी इन्व्हेस्टरला बरोबर घेतलं होतं. आर्थिक व्यवहारात अमोल यांना सखोल ज्ञान नसल्यामुळे इन्व्हेस्टरनेही या साईटमध्ये त्यांचा गैरफायदा घेतला. असं असूनही अमोल यांनी सर्व अडचणींवर मात करत ती साईट वेळेत पूर्ण केली. या साईटचा कामाचा दर्जा एवढा चांगला होता की, त्यातूनच पुढे त्यांना अनेक कामं मिळत गेली. माऊथ पब्लिसिटी ही सर्वांत मोठी जाहिरात समजली जाते, याची प्रचिती अमोल यांना आली. इथून त्यांच्या बांधकाम क्षेत्रातील प्रवासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

लोकांच्या मनामध्ये रावेतकर ग्रुपने हळूहळू स्थान मिळवलं. लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास दिवसेंदिवस वाढत गेला. त्याचीच पावती म्हणून रावेतकर ग्रुपने आजपर्यंत पुण्यातील सेनापती बापट रोड, डहाणूकर कॉलनी, आयडियल कॉलनी, सहकारनगर, कर्वे रोड अशा शहराच्या मुख्य ठिकाणी रीडेव्हलपिंगची कामं केली आहेत. आजपर्यंत रीडेव्हलपिंगचं सहा लाख स्क्वे. फूट इतकं काम अमोल यांनी रावेतकर ग्रुपच्या माध्यमातून पूर्ण केलं असून सद्यस्थितीत तीन लाख स्क्वे. फूट इतकं काम सुरू आहे. गेल्या दशकात, रावेतकर ग्रुपने पुण्याच्या सर्वाधिक लोकप्रिय आणि मध्यवर्ती ठिकाणी रीडेव्हलपिंगचं उत्कृष्ट काम केलं आहे. रावेतकर ग्रुप हा रीडेव्हलपिंग क्षेत्रातील एक आयकॉन बनला आहे.

पुण्याचे जुने पत्ते आणि खुणा ताज्या हवेचा श्वास घेण्याच्या दिशेने रीडेव्हलपिंग हा पुणेकरांच्या जीवनशैलीसाठी सर्वांत महत्त्वाचा भाग बनला आहे. पुण्याच्या पारंपरिक आकर्षणाचे जतन करत रावेतकर ग्रुपने विकासाची ही गरज ओळखून लोकांच्या अपेक्षा आणि नवीन लाईफस्टाईलचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी रीडेव्हलपमेंट करून पुण्यात स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. यासाठी रावेतकर ग्रुपने आपलं सर्व स्किल या क्षेत्रासाठी समर्पित केलं आहे. पुण्यातील काही जुन्या रहिवासी असलेल्या महत्त्वाच्या जागांना एक नवीन ओळख देण्याचं त्यांचं मुख्य उद्दिष्ट आहे.



रावेतकर ग्रुपने वेगवेगळ्या रिअल इस्टेट विभागांमध्ये महत्त्वाचे टप्पे विकसित केले आहेत. यामध्ये पुणे व आसपासच्या निवासी, व्यावसायिक तसेच औद्योगिक विभागातील काही संस्मरणीय रचनांचा समावेश आहे. रावेतकर ग्रुपने आजपर्यंत सुवर्णा, अंजलिकुंज, मनाली, पियुषा, अनुषा, ओम ब्रह्मा, ट्यूलिप्स, राहुल विहार, पौर्णिमा, अंगराज रेसॉर्ट, अंगराज वॉटर पार्क आणि श्रीओम हे प्रोजेक्टस पूर्ण केलेले आहेत. जान्हवी, सुखनिवास, ७० वेस्ट ॲव्हेन्यू, अनुश्री, अरिहंतश्री, धनगौरी या त्यांच्या प्रोजेक्टसचं काम सध्या सुरू आहे. अरिषा, धनगौरी, महालक्ष्मी, अदिती आणि स्वरगंधा हे त्यांचे भविष्यातील प्रोजेक्टस आहेत.




अमोल यांचे भाऊ अलंकार रावेतकर हे कॉम्प्युटर इंजिनीअर. एका नामांकित कंपनीत ते कार्यरत असतानाही रावेतकर ग्रुपचा वाढता पसारा लक्षात घेऊन अमोल यांनी त्यांना रावेतकर ग्रुपमध्ये आपल्यासोबत काम करण्यासाठी घेतलं आहे. त्यांचीदेखील खूप मदत त्यांना होत आहे. अमोल सांगतात, ''आजपर्यंतची यशस्वी वाटचाल मी पूर्ण करू शकलो ती केवळ पत्नी अदिती हिची भक्कम साथ व पाठिंब्यामुळे. प्रत्येक यश–अपयशात ती माझ्या सोबत राहिली. मला धीर दिला.'' अमोल यांना दोन मुली असून त्यांची मोठी मुलगी अनुषा ही सिम्बॉयसिस स्कूलमध्ये दहावीचं शिक्षण घेत आहे तर त्यांची दुसरी मुलगी तिसरीत शिकत आहे.




व्यावसायिक क्षेत्रात प्रगती करत असतानाच अमोल यांनी त्यांचं सामाजिक भानही जपलं आहे. कंपनीच्या सीएसआर ॲक्टिव्हिटी अंतर्गत अनेक सामाजिक कामांत त्यांनी आपलं योगदान दिलं आहे. समाजात मुलगा–मुलगी यांतील दरी जरी कमी होत आली असली तरी अजूनही ग्रामीण आणि शहरी भागात मुलांच्या शिक्षणावर जास्त भर दिला जातो. त्यामुळे अनेक मुली शिक्षणापासून वंचित राहतात. अमोल हे सामाजिक प्रश्नांबाबत अतिशय संवेदनशील आहेत. लहानपणीच त्यांनी अनेक सामाजिक विषमता अनुभवली आहे. गरिबी, आर्थिक अडचणी काय असतात हे त्यांनी अनुभवल्यामुळे त्यांचं सामाजिक भान जागृत आहे. या प्रश्नावर तोडगा काढत त्यांनी ग्रामीण भागातील व शहरातील आर्थिक दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली आहे. या मुलींच्या शैक्षणिक फी पासून वेगवेगळ्या कलागुणांना वाव देण्यासाठी येणाऱ्या खर्चाची जबाबदारी ते स्वतः उचलतात. त्यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे अनेक मुली आज शिक्षण, कला, क्रीडा क्षेत्रात प्रगतिपथावर आहेत. अनेक मुली परदेशातही शिक्षण व नोकरीसाठी जाऊन स्थिरस्थावर झाल्या आहेत. आर्थिकदृष्ट्या कमजोर असणाऱ्या मुलींच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या श्यामची आई या संस्थेमार्फत ते हे काम करतात.

ग्रामीण व शहरातील झोपडपट्टी भागात मुलींसाठी टॉयलेटची समस्या हा एक गंभीर प्रश्न आहे. मुलींची ही गरज लक्षात घेऊन अमोल यांनी काही सामाजिक संस्थांबरोबर संलग्न राहून मुलींसाठी ग्रामीण व शहरी भागात शेकडो टॉयलेटची उभारणी केली आहे. अमोल सांगतात, ''एकंदरीतच आपल्या समाजरचनेत मुलांपेक्षा मुलींच्या गरजांकडे कमी लक्ष दिलं जातं. त्यामुळे मुलींच्या समस्या सोडवण्यासाठी मी विशेष प्राधान्य देतो.

कोरोना महामारीच्या काळात अमोल यांनी आपलं सामाजिक दायित्व निभावलं आहे. या कठीण काळातही त्यांनी कोरोना योद्धा म्हणून या काळात आरोग्य सेवा पुरवताना ज्या–ज्या सुविधा अपुऱ्या पडतात त्यामध्ये मदत करण्याचा त्यांनी आपला पायंडा कायम ठेवला आहे. कोरोनाच्या या कठीण काळात सुरुवातीला त्यांनी स्वॅब कलेक्शन बुथ डिझाईन करून ते महानगरपालिकेला हस्तांतरित केलं. त्याचबरोबर हॅन्ड सॅनिटायझर, मास्क यांचाही पुरवठा गरजेनुसार गरीब व गरजू लोकांना केला.

अमोल सांगतात, ''बांधकाम क्षेत्रात वास्तू हस्तांतरित करताना ग्राहकांच्या चेहऱ्यावरील हास्य, आनंद व समाधान हाच आमच्यासाठी सर्वांत मोठा पुरस्कार असतो.'' असं असलं तरी रावेतकर ग्रुपला समाजातील अनेक

नामांकित घटकांनी वेगवेगळ्या पुरस्कारांनी सन्मानित केलं आहे. प्रेस, सामाजिक संस्था, बांधकाम क्षेत्रातील संस्था अशा अनेक संस्थांनी त्यांच्या कामाची दखल घेत त्यांना वेगवेगळ्या पुरस्कारांनी सन्मानित केलेलं आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील अग्रगण्य असणाऱ्या 'लोकमत' या वृत्तसंस्थेने 'लोकमत नॅशनल अॅवॉर्ड फॉर एक्सलन्स २०१५' या अॅवॉर्डने त्यांना सन्मानित केलं आहे. 'इकॉनॉमिक टाईम्स' या भारतातील आर्थिक क्षेत्रातील नामांकित वृत्तपत्राने त्यांना बांधकाम क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल 'बेस्ट रिअॅलिटी अॅवॉर्ड'ने सन्मानित केलं आहे. 'एबीपी माझा' या न्यूज चॅनलने त्यांना 'यंग अचिव्हर्स अॅवॉर्ड' या सन्मानाने सन्मानित केलं आहे. तर 'ब्रॅन्ड अकॅडमी' या संस्थेने त्यांना 'बिझनेस एक्सलन्स अॅवॉर्ड' दिलं आहे. अशा अनेक सन्मानांनी रावेतकर ग्रुप हा पुण्यातील बांधकाम क्षेत्रातील एक वेगळा ठसा उमटवणारा ग्रुप बनला आहे.



भविष्यात रावेतकर ग्रुप हा पुणे शहरालगत असणाऱ्या नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर, मुंबई, सोलापूर, औरंगाबाद या शहरांमध्ये रीडेव्हलपमेंटच्या स्कीम करण्यासाठी इच्छुक आहे. त्यासाठी त्यांची बोलणी विविध सोसायट्या, जागामालक यांच्याशी चालू आहे. भविष्यात या भागांमध्ये रावेतकर ग्रुप आपला ठसा उमटवेल याबाबत नक्कीच खात्री वाटते. अमोल यांनी गरिबी ऐन तारुण्यात अनुभवली असल्यामुळे त्यांना मध्यमवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या अडचणींची प्रचंड जाण आहे. त्यामुळे त्यांनी अशा घटकांसाठी पुणे आणि परिसरामध्ये वेगवेगळ्या स्कीम राबवण्याचा निश्चय केला आहे. त्यादृष्टीने जागा शोधण्याच्या प्रयत्नात ते सध्या आहेत. गरीब लोकांना स्वतःच्या मालकीचं घर असावं हा त्यामागील त्यांचा उद्देश आहे. हे करत असताना त्यांच्या कर्मचाऱ्यांमध्ये ज्युनिअर इंजिनीअर व इतर कर्मचारी वर्ग यांनाही स्वतःच्या मालकीचं घर देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

खरं तर, अमोल हे हाडाचे कलाकार आहेत. कलाक्षेत्राबद्दल त्यांना प्रचंड आकर्षण व आदर आहे. त्यामुळे कोविड काळात आर्थिक अडचणीत सापडलेल्या कलाकारांबद्दल ते अतिशय संवेदनशील आहेत. कोविड काळात अशा कलाकारांसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली आहे. भविष्यात अमोल यांना स्वतःची सामाजिक संस्था सुरू करून समाजातील दुर्बल घटकांसाठी काम करण्याची इच्छा आहे. यामध्ये विशेषतः मुली व कलाक्षेत्रातील लोकांना प्राधान्य देण्याचा त्यांचा मानस आहे.

बांधकाम क्षेत्रात अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वं समाजात प्रचलित आहेत. परंतु त्यांपैकी क्वचितच फार कमी लोकांना आपलं सामाजिक भान आहे. अशा निवडक लोकांपैकी अमोल रावेतकर हे एक व्यक्तिमत्त्व. लहानपणीच श्रीमंती, गरिबी याचा अनुभव घेऊन समाजात एक समाजभान जपणारं व्यक्तिमत्त्व म्हणून ते आज प्रचलित आहेत. रीडेव्हलपमेंट क्षेत्रं असो वा नवीन गृहप्रकल्प असोत, या दोन्ही क्षेत्रांत आपला वेगळा ठसा उमटवणारे अमोल हे समाजाप्रती विशेष संवेदनशील वाटतात. ऐन तारुण्यात करिअर ओरिएंटेड मित्र मिळाल्यामुळे त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा प्राप्त झाली. अशा या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाची भविष्यात बांधकाम क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगती व्हावी व त्यांच्या हातून समाजातील दुर्बल घटकांना मदत व्हावी ही सदिच्छा.